# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

☏ २५६५६२३४ Email:ropune@dtemaharashtra.gov.in Web Site :- www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/ NSP पोर्टल/ २०१९/ 4961 दिनांक :- 03 DEC 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- सन 2019-20 साठी केंद्र शासनाच्या NSP पोर्टलवरील गुणवत्ता-नि-सासधन शिष्यवृत्ती योजना अमलबजावणीबाबत...

संदर्भ :- १ संचालनालयाचे पत्र क्र 18/तशिस/ वि.का.पत्र/MCM/2019/539 दिनांक 02/12/2019

केद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीचे संस्थांनी त्याच्या लॉगीनमधून अर्जाची छाननी/तपासणी करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक ३०/११/२०१९ पर्यंत देण्यात आलेली होती.

सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, **संस्थाना सदर अर्ज तपासणीसाठी दिनांक १०/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये (Clerk/Principal Login) विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता विहीत मुदतीत निकाली काढावेत.**

**सदर मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले किंवा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्याची राहील. अर्ज तपासणीसाठी संस्थांना यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.**

3.12.19
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

F/C


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई. ४०० ००१

दूरध्वनी क्र. २२६१७९६९ फॅक्स क्र. २२६९०००७

E-mail: desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**महत्त्वाचे -- स्पीडपोस्ट/ईमेलद्वारे** का.क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र /MCM/२०१९/ ५३९

दिनांकः- ०२ /१२/२०१९

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नागपूर / अमरावती / नाशिक / औरंगाबाद.

२) मा. संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई- ४००००१.

३) मा. संचालक,
आयुष संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई- ०१.

**विषय :- सन २०१९-२० साठी केंद्र शासनाच्या NSP पोर्टलवरील गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना अंमलबजावणीबाबत...**

**संदर्भ :-** १. या संचालनालयाचे पत्र क्र. का.क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र /MCM/२०१९/५१० दि. १५/११/२०१९
२. केंद्र शासनाचा संस्थास्तरांवरील तपासणीची मुदतवाढीबाबतचा दि.०२/१२/२०१९ रोजीचा ईमेल

तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य, मुंबई यांचेमार्फत मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या National Scholarship Portal द्वारे ( **www.scholarships.gov.in** ) **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( Merit cum Means Based Scholarship ) योजना** ऑनलाईनरित्या राबविली जाते ज्याचे State Nodal Officer म्हणून संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना घोषित करण्यात आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता विद्यार्थ्यांनी National Scholarship Portal पोर्टलवर **गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती** योजनेचे भरलेले अर्ज संस्थास्तरांवर ऑनलाईनरित्या तपासणीची कार्यवाही सुरु आहे. **केंद्र शासनाच्या गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजनेचे** शै. वर्ष २०१९-२० साठीचे संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज तपासणी करण्याची अंतिम मुदत **दि. ३०/११/२०१९** पर्यंत दिली होती हे संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये कळविले होते. परंतु अद्यापही काही अर्जांच्या तपासणीची कार्यवाही संस्था स्तरांवर प्रलंबित असल्यामुळे केंद्र शासनाच्या संदर्भ क्र २ च्या ईमेलने प्राप्त निर्देशानुसार, सदर मुदत आता **दि.१०/१२/२०१९ पर्यंत** वाढविण्यात आलेली आहे. (अधिक माहिती नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर (NSP) उपलब्ध आहे.) प्रलंबित अर्जांच्या माहितीचा NSP पोर्टलद्वारे प्राप्त दि.०२/१२/२०१९ रोजीचा तक्ता सोबत जोडला आहे.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपण आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे की, संस्थांनी लॉगीन आयडीमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अंतिम मुदतीपूर्वी निकाली काढावे व जर अंतिम मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले व कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याबाबतदेखील सूचित करावे.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत - **यांना माहितीसाठी सविनय सादर .**

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२.(लक्षवेध - श्री. धारुरकर, अवर सचिव )

२. मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. (लक्षवेध - श्री. जाधव, कक्ष अधिकारी )

NSP Portal - 2019-20 02/12/2019

| r. No. | Scheme Name | Total Application | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Received | Final Verified | Defective | Rejected | Pending at Institute | Pending at Dist/State |
| 1 | MERIT-CUM-MEANS SCHOLARSHIP FOR PROFESSIONAL AND TECHNICAL COURSES CS | 8303 | 491 | 149 | 1335 | 613 | 5715 |
| Total | | 8303 | 491 | 149 | 1335 | 613 | 5715 |

| No. | Scheme Name | Total Application | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Eligible | Renewed | Final Verified | Defective | Rejected | Pending at Institute | Pending at Dist/State | Total Withdrawn |
| 1 | MERIT-CUM-MEANS SCHOLARSHIP FOR PROFESSIONAL AND TECHNICAL COURSES CS | 2974 | 2037 | 1359 | 37 | 88 | 435 | 11 | 107 |
| Total | | 2974 | 2037 | 1359 | 37 | 88 | 435 | 11 | 107 |